दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.१८ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ८८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 18 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 88 | Pages 4 | Rate 4 Rs

## माहिती वेगळी, निकाल वेगळा

**मुंबई–** शरद पवार यांनी बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालावर भाष्य करताना, सत्ताधारी पक्षांनी अवलंबलेल्या 'आर्थिक मदतीच्या' धोरणावर गंभीर चिंता व्यक्त केली. बिहार विधानसभा निकालाबाबत आमची माहिती वेगळी होती आणि निकाल वेगळा लागला. मात्र, लागलेला निकाल स्वीकारायचा असतो.

निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजनेसारखी योजना महाराष्ट्र असो किंवा बिहार त्या ठिकाणी सरसकट महिलांना पैसे देण्यात आले. नगरपालिका निवडणुकीत पैसे वाटप होतात हे आम्ही ऐकले होते पण सरकारच्या माध्यमातून सबंध महिला वर्गाला १० हजार देणे हे आम्ही कधी ऐकले नव्हते. याचे काही परिणाम होतात की नाही हे लोकांनी ठरवावे. दहा हजार दिले तेच सत्ताधाऱ्यांच्या विजयाचे कारण असेल तर आम्हाला बसून विचार करावा लागेल, असंही शरद पवार म्हणाले.

# हवेत गोळीबार करणाऱ्यांना जमीन दिसली मुख्यमंत्री फडणवीसांचा विरोधकांवर निशाणा

## स्थानिकच्या निवडणुकांतही 'माती' होण्याचे भाकीत

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–विरोधक हे सातत्याने आरोप करतात, पण कोर्ट जेव्हा त्यांना पुरावे मागते, तेव्हा ते देत नाहीत. निवडणूक आयोग देखील त्यांना पुरावे मागतो, पण एक पुराव देखील विरोधक देऊ शकत नाहीत. हवेत गोळीबार करणाऱ्यांना जमीन दिसलेली आहे, मात्र अजुनही ते सुधरले नाहीत. महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही त्यांची अशाच प्रकारची माती होणार असल्याचे भाकित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.छत्रपती संभाजीनगर शहरात आज भाजपच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. हे कार्यालय मराठवाडा विभागासाठी असणार आहे. यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला.**

आजचा दिवस आपल्या सगळ्यांसाठी महत्त्वाचा दिवस आहे. मी विशेष उल्लेख आणि अभिनंदन मंत्री अतुल सावे यांचे करू इच्छितो. त्यांनी छत्रपती संभाजीनगरमधील कार्यालय उभारताना अतिशय मोलाची भूमिका बजावली. जमीन शोधण्यापासून ते कार्यालयाची इमारत उभी राहण्यापर्यंत सातत्याने येणाऱ्या अडचणींचा सामना अतुल सावे यांनी केला, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.आपले नेते प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांचे मराठवाडा आणि छत्रपती संभाजीनगरवर प्रचंड प्रेम होते. भाजपच्या वाटचालीत प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, वसंतराव भागवत या सगळ्या लोकांनी सातत्याने आपली कार्यालये झाली पाहिजेत, पक्षाला स्थैर्य आले पाहिजे, यासाठी त्या काळात खूप प्रयत्न केले. त्याकाळची आपली परिस्थिती आणि पद्धतीनुसार जसे मिळतील तसे कार्यालये त्या काळात उभे केले आणि पक्षाला चालवले. कुठे नाही उभे राहू शकले, तर किरायाच्या जागेवरून पक्ष चालवला. पण आपली कार्यालये चांगली असली पाहिजेत, असे त्याकाळी आपले स्वप्न होते. आता प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे हे स्वर्गातून आपल्याला



आशीर्वाद देत असतील, असे फडणवीस म्हणाले. छत्रपती संभाजीनगर येथील शहर आणि जिल्ह्याचे कार्यालय असले, तरी ते विभागाचे देखील कार्यालय असणार आहे. या कार्यालयात वेगवेगळया प्रकारे काम करण्यासाठी पदाधिकाऱ्यांच्या केबिन्स आहेत. माध्यमांसाठी सुसज्जित हॉल आहे. दोन मोठे हॉल आहेत. छत्रपती संभाजीनगरला प्रदेश कार्यकारणी करायची असेल, तर या कार्यालयात होऊ शकते, एवढी व्यवस्था या कार्यालयात आहे. विभागीय बैठकी या ठिकाणी होऊ शकतात. या ठिकाणी बोर्ड रूम देखील आहे. सर्व सुविधांनी युक्त अशा प्रकारचे उत्तम कार्यालय तयार केले, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय व्हावे ही शहांची इच्छा

**देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, २०१४ साली आपले सरकार आल्यानंतर देशामध्ये अमित शहा यांनी भाजपची जबाबदारी घेतली. त्यावेळी प्रत्येक जिल्ह्यात भाजपचे प्रशस्त कार्यालय झाले पाहिजे, अशी इच्छा अमित शहांनी बोलून दाखवली आणि त्यासाठी प्रयत्न सुरू करा, असे अमित शहांनी आम्हाला सांगितले, असे फडणवीस म्हणाले. तेव्हापासून प्रत्येक जिल्ह्यात जमीन खरेदी करणे, प्लॅन मंजूर करणे, कार्यालय उभे करण्याचे आपले कार्य सुरू आहे. कुठेही सरकारी जमिनी घ्यायच्या नाहीत, अनधिकृत बांधकाम करायचे नाही, शंभर टक्के परवानग्या घेऊनच भाजपचे कार्यालय तयार झाले पाहिजे, हे तत्त्व आपण पाळले.**

# हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीला अभिवादन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करताना सेवा जनशक्ती पार्टीच्या लोहा येथील कार्यालयात एक विशेष कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास शिवा संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख तसेच राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषदेचे अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर उपस्थित होते.

यावेळी शिवा संघटनेचे नव्याने नियुक्ती करण्यात आलेले लोहा तालुकाध्यक्ष रविराज होळगे, शिवा विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम घोडके, शहराध्यक्ष सूर्यकांत आनेराव,



व्यापारी उपजिल्हाध्यक्ष गणेश घोडके, सेवा जनशक्ती पार्टीचे शहरप्रमुख पिंटू वड्डे तसेच गजानन होळगे, मलकार्जुन होळगे, बळी नलबले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याचा रीमझिम आठवणींनी उजाळा देत त्यांचे हिंदुत्व, नेतृत्वगुण आणि जनसामान्यांसाठीची भूमिका यावर उपस्थितांनी मनोगते व्यक्त केली. उपस्थित कार्यकर्त्यांनी संघटन बळकटीकरण आणि सामाजिक कार्याची गती वाढवण्याचा संकल्पही व्यक्त केला.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ई–केवायसीला मुदतवाढ!

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे,उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संपूर्ण राज्यात अतिशय यशस्वी रित्या राबवली जात आहे. याबाबत दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी सर्व लाभार्थ्यांनी इ केवायसी प्रक्रिया करावी अशा सूचना यापूर्वी देण्यात आल्या होत्या.परंतु,गेल्या काही दिवसांत राज्यात आलेल्या नैसर्गिकआपत्ती आणि इतर अडचणींमुळे, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील अनेक पात्र भगिनींना इकेवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली




नाही,याची पूर्ण कल्पना आहे.या अडचणींची गांभीर्याने नोंद घेत राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

लाडकी बहीण योजनेच्या ई केवायसी करण्याची अंतिम मुदत आता दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच ज्या पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे. त्या लाभार्थी महिलांनी स्वतःची ई केवायसी करावी व त्यांचे पती अथवा वडील यांचे अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र व घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा.न्यायालयाचा आदेश याची सत्यप्रत संबंधित जिल्ह्यातील महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे जमा करावी.या निर्णया मुळे योजनेच्या लाभाची सातत्यता आणि अखंडितता कायम राहणार आहे.ज्या भगिनींनी अद्याप इ केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही,त्यांना विनंती आहे की त्यांनी या विस्तारित मुदतीचा लाभ घेत ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवसेना नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख अशोक पाटील मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

शिवसेना नांदेड दक्षिण तालुकाप्रमुखअशोक पाटील मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना युवासेना सोनखेड सर्कलतर्फे विविध जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन *मा. खा. हेमंतभाऊ पाटील (उपनेते शिवसेना, राज्यमंत्री दर्जा व आमदार), आ. आनंदराव पाटील बोंढारकर(विधानसभा सदस्य, नांदेड दक्षिण) व विनयभाऊ गिरडे (जिल्हाप्रमुख, शिवसेना नांदेड दक्षिण) यांच्या हस्ते होणार आहे.



कार्यक्रमात खालील मोफत आरोग्यसेवा उपलब्ध राहणार आहे:

* मोफत नेत्र तपासणी
* मोफत बी.पी. व शुगर तपासणी
* मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया
* मोफत चष्मे वाटप
* सर्व रोग निदान शिबीर व उपचार
* लाडकी बहिण योजना E-KYC मोफत
* १० लाखांपर्यंत आरोग्य कार्ड मोफत
* दातांच्या रोगांवरील मोफत उपचार
* हात-पायातील मुंग्या येणाऱ्या रुग्णांसाठी फिजिओथेरपी उपचार

हा उपक्रम दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० या वेळेत शिवसेना जनसंपर्क कार्यालय, सोनखेड* येथे आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाची माहिती आयोजक - शिवसेना युवासेना, सोनखेड सर्कल व अशोक भाऊ मोरे यांच्या मित्रमंडळीच्या* वतीने करण्यात आले आहे.

# मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावर राजकीय प्रवासातील पहिला गुन्हा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था**

नवी मुंबईतील नेरूळ परिसरात चार महिन्यांपासून झाकून ठेवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी परवानगी न घेता अनावरण केल्यानंतर या प्रकरणाने मोठा राजकीय रंग घेतला आहे. स्थानिक पोलिसांनी या घटनेची नोंद घेत अमित ठाकरे आणि त्यांच्या सोबत उपस्थित असलेल्या सुमारे ७० मनसैनिकांवर गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, अमित ठाकरे यांच्या राजकीय प्रवासातील हा पहिलाच गुन्हा असून त्यामुळे या कारवाईकडे राज्यभरातून लक्ष लागले आहे.नेरूळमधील राजीव गांधी उड्डाणपुलाजवळ उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या चार महिन्यांपासून अनावरणाशिवाय तसाच कापडाने झाकलेला होता. नागरिकांकडून या संदर्भात तक्रारी येत असतानाही अधिकृत अनावरणासाठी कोणत्याही मंत्री किंवा पदाधिकाऱ्याला वेळ न मिळाल्याचा स्थानिकांचा आरोप होता. ही बाब अमित ठाकरेंना कळताच त्यांनी कोणतीही परवानगी न घेता मनसैनिकांच्या उपस्थितीत पुतळ्यावरील कापड हटवून अनावरण पूर्ण केले. या वेळी पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केल्याने दोन्ही बाजूंमध्ये ढकलाढकलीही झाली.

# नंदुरबार पोलिसांचे मोठे यश! २१५ गहाळ मोबाईल परत; ३२ लाखांहून अधिक किमतीचा ऐवज हस्तगत

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी.**

नंदुरबार जिल्हा पोलीस दलाने मोठी कामगिरी करत नागरिकांचे गहाळ झालेले एकूण २१५ मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. या हस्तगत केलेल्या मोबाईलची किंमत अंदाजे ३२ लाख ०७ हजार ८९६ रुपये इतकी आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई यशस्वी झाली. मागील काही महिन्यांमध्ये नागरिकांचे विविध कंपन्यांचे मोबाईल गहाळ झाले होते. हे शोधण्यासाठी नंदुरबार पोलिसांनी 'सी.ई.आय.आर. पोर्टल'चे मदतीने मोबाईलच्या आय एम ई आय क्रमांकाचा वापर करून विशेष शोधमोहीम राबवली. या मोहिमेत सायबर सेल, स्थानिक गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलीस ठाणे यांनी संयुक्तरीत्या काम केले. गहाळ झालेले मोबाईल केवळ जिल्ह्यातूनच नव्हे, तर जिल्ह्याबाहेरूनही हस्तगत



करण्यात आले.

दिनांक १७ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयातील संवाद हॉल येथे आयोजित कार्यक्रमात गहाळ झालेल्या मोबाईलचे मूळ मालकांना त्यांचे मोबाईल जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या हस्ते परत करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी पोलिसांच्या या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले आणि त्यांचे आभार मानले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांनी नागरिकांना आवाहन केले की, मोबाईल हरवल्यास तात्काळ सी.ई.आय.आर. पोर्टलवर ऑनलाईन तक्रार दाखल करावी. तसेच आपल्या मोबाईलचा आय एम ई आय क्रमांक जपून ठेवणे गरजेचे आहे, जेणेकरून मोबाईलचा लवकर शोध घेण्यास मदत होईल. या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील तसेच इतर अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

संपादकीय

# निर्विवाद भाजप

बिहारमध्ये पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार येणार हे जितकं अपेक्षित होतं, तितकंच ही आघाडी द्विशतक ठोकेल, हे अनपेक्षित होतं. प्रत्यक्षात दोन्ही गोष्टी बिहारच्या मतदारांनी अगदी सहजपणे घडवून आणल्या. नितीशकुमार यांचा बिहारवर प्रभाव किती? या तिसऱ्या प्रश्नाचं उत्तरही मतदारांनी होकारार्थीच दिलं आणि राष्ट्रीय जनता दल जोपर्यंत आपल्या यादव - मुस्लीम परिघातून बाहेर येत नाही, तोपर्यंत त्यांची कामगिरी सुधारण्याची कोणतीही आशा नाही, हेही स्पष्ट केलं. मतदानोत्तर सर्वेक्षणाचे अंदाज किती फोल असतात हे बिहारच्या मतदारांनीही पुन्हा एकदा दाखवून दिलं. बिहारच्या निवडणूक निकालात मग लक्षणीय असं काहीच नाही का? तर, आहे. खूप काही आहे. काल संध्याकाळी उशिरापर्यंत सगळे निकाल लागले नव्हते. आकडे वरखाली होत होते. त्यामुळे, अशा अर्धवट निकालावर पूर्ण विश्लेषण करणं योग्य नाही म्हणून काही निष्कर्ष इथे आजच मांडता येत नाहीत. मतदारांनी जो कल दाखवला आहे, त्यावरून काही निरीक्षणं मात्र निश्चितच नोंदवता येतील. भारतीय मतदाराची मानसिकता कशी बदलते आहे, त्याचंच ते प्रतीक आहे. बिहारमध्ये यावेळी उच्चांकी मतदान झालं. महिलांचा उत्साह 'न भूतो...' असा होता. जातीचा विचार हे बिहारच्या मतदाराचं अगदी व्यवच्छेदक लक्षण मानलं जातं. यावेळी मात्र थोडं त्यापलीकडे जाऊन बिहारने भौतिक मुद्द्यांवर मतदान केलेलं दिसतं. निवडणुका हा जर स्वप्न दाखवण्याचा खेळ असेल, तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीतल्या भारतीय जनता पक्षाने तो आपल्या नेहमीच्या कौशल्याने जिंकला, असं म्हणता येईल.गेली वीस वर्षं नितीशकुमार बिहारचं नेतृत्व करत आहेत. या वीस वर्षांत त्यांनी भाजप आणि राष्ट्रीय जनता दल या दोन्ही पक्षांना सोयीनुसार बरोबर घेतलं. आपल्या गरजेनुसार वाकवलं. लोक जनशक्ती पार्टी या आघाडीतल्या तिसऱ्या पक्षाचे पंख भाजपला कापायला लावले. त्यांच्या आजारपणाच्या चर्चा करणाऱ्या सगळ्यांची तोंडं बंद केली. या चर्चेमुळे मिळालेल्या सहानुभूतीचा पुरेपूर उपयोग करून घेतला. भाजपच्या बरोबरीने जागा निवडून आणल्या. पुढचा मुख्यमंत्री ठरवताना आपला शब्दच अंतिम राहील, एवढी कामगिरी तर नक्कीच केली. लढलेल्या जागांपैकी ९०% जागा जिंकून भाजप पहिल्या क्रमांकावर असला, तरी त्याच न्यायाने ८०% जागा जिंकून नितीशकुमार यांचा जनता दल (संयुक्त) दुसऱ्या क्रमांकावर आहे. लोक जनशक्ति पार्टी (रामविलास) ७६ टक्के यश मिळवून तिसऱ्या क्रमांकावर आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला एकूण मतदारांपैकी ५० टक्के मतांचा वाटा मिळेल, असा प्राथमिक अंदाज आहे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला जेमतेम १२५ जागा मिळाल्या होत्या. भाजपच्या त्यात ७४ जागा होत्या. जनता दल (संयुक्त) ४३ जागा जिंकून आघाडीत दुसऱ्या क्रमांकावर होता. या निवडणुकीत भाजपने आपल्या जागांत दणदणीत वाढ केली; पण त्यापेक्षाही जास्त वाढ नितीशकुमारांनी करून दाखवली. भाजपने दिलेल्या मुख्यमंत्रीपदाच्या संधीचं त्यांनी याप्रकारे सोनं केलं. विरोधकांनी त्यांना 'पलटुराम' म्हणून कितीही हिणवण्याचा प्रयत्न केला, तरी बिहारच्या जनतेने त्यांच्या 'सुशासनबाबू' या प्रतिमेवर शिक्कामोर्तब केलं. बिहारच्या जनतेला लालूंचं 'जंगलराज' अजूनही आठवतं आहे, हाच त्याचा अर्थ. महिला मतदाराला आपला जनाधार करण्याचा निर्णय नितीशकुमार यांनी पाच वर्षांपूर्वीच घेतला होता. त्याची सुरुवात त्यांनी बिहारमध्ये दारूबंदी लागू करून केली. भारतीय जनता पक्षाच्या अन्य राज्यांनी राबवलेल्या योजनेच्या धर्तीवरील 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजना' राबवून त्यांनी सव्वाकोटी महिलांच्या बँक खात्यात निवडणुकीपूर्वीच प्रत्येकी दहा हजार रुपये जमा केले. १२५ युनिट मोफत वीज देण्याची कल्पना भाजपची. पण, त्या योजनेला सौर ऊर्जेची जोड देऊन सौर पॅनल मोफत देऊन दीड कोटी कुटुंबांना त्यांनी आपलंसं केलं. जातनिहाय जनगणना करून इतर मागासवर्गीयांतल्या अधिक मागास जातींचा विशेष गट करून त्यांच्यापर्यंत योजनेचे लाभ थेट पोहोचवण्याचा सामाजिक कार्यक्रमही त्यांना चांगला लाभ देऊन गेला. बिहारच्या एकूण लोकसंख्येत या जातींचा वाटा ३६ टक्के आहे.भारतीय जनता पक्षाचा जनाधार असलेल्या उच्च जाती आणि नितीशकुमार यांनी जनाधार मिळवलेल्या या इतर मागास जाती अधिक जितनराम मांझी अधिक चिराग पासवान यांच्या पक्षाचे जनाधार मिळून बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मतदारांची सामाजिक मोट व्यवस्थित बांधली गेली. या जातीय समीकरणांपलीकडे महिला आणि युवकांना 'रालोआ'ने विशेष लक्ष्य केलं. हे राजकीय शहाणपण 'महागठबंधन' ला दाखवता आलं नाही. एखाद् दुसऱ्या जागेपुरती आपली ताकद शिल्लक राहिल्याचं भान अजूनही काँग्रेसला येत नाही. जुनी खोंडं, त्यांचे दुराग्रह दूर करणं राहुल गांधींना जमत नाही. त्यांनी मोठी पदयात्रा काढली. पुरात पोहून दाखवलं, पण जोपर्यंत ते पक्ष संघटना चालवून दाखवत नाहीत, तोपर्यंत मतदारांनी त्यांना मतदान का करावं? काँग्रेसच्या संघटनेचा, मतदाराचा आत्मविश्वास दर निवडणुकीगणिक ढासळतोच आहे. तो सावरायचा असेल, तर सामाजिक गणित जुळवणाऱ्या जाणकार सल्लागारांची त्यांना आवश्यकता आहे. केवळ आधुनिक पेहराव आणि भाषा करून भारतातला नवयुवक त्यांच्या मागे जाणार नाही, हे त्यांनी ओळखायला हवं. एका बाजूला मातीचा गंध नसलेले 'एलिट सल्लागार' आणि दुसऱ्या बाजूला ठार डावे यांच्यात स्वतः राहुल गांधी यांचाच तोल ढळला आहे. तो सावरणार नाही, तोपर्यंत काँग्रेसच्या भवितव्याबाबत कोणतीही आशा ठेवता येणार नाही. या निवडणुकीत राष्ट्रीय जनता दल हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरेल, असं भाकीत काहींनी वर्तवलं होतं. जमिनीवरचं वास्तव न पाहता हवेत इमले बांधणाऱ्यांची अशी भाकितं सपशेल फसतातच. तेजस्वी यादव यांचं मुख्यमंत्रीपदच काय, विधानसभेत विरोधी पक्षनेता तरी असेल की नाही, अशी आकडेवारी आहे! यादव आणि मुस्लीम या आपल्या परंपरागत मतदाराबाहेर पडायला 'राजद' तयारच नाही. राजदच्या १४२ उमेदवारांपैकी यावेळीही ५२ उमेदवार यादव होते. आपल्या परंपरागत कल्पना, जनाधार, 'कुटुंबाचा पक्ष' ही प्रतिमा यातून बाहेर पडल्याशिवाय त्यांना यश मिळणं शक्य नाही. पूर्वी यादव ज्या इतर मागासवर्गीय जातींचं नेतृत्व करत होता, त्या जातींनीच आपली जागा बदलली आहे, याचं भान यादव कुटुंबाला नाही. काँग्रेसला तर अशा गोष्टींची कुणकुणही नाही. अशा परिस्थितीत यापेक्षा वेगळ्या निकालाची अपेक्षा नव्हतीच.

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला वाघाचा आधार लाभला!

चांदोलीच्या जंगलात तीन वाघ कॅमेऱ्यात कैद झाले तरी त्यांचे वास्तव्य येथे नाही या सत्यावर उपाय शोधत ताडोबा-अंधारीतून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे 'तारा' या वाघिणीचे हस्तांतर या आठवड्यात झाले. हा दक्षिण महाराष्ट्राच्या जंगलांना मिळालेला नवजीवनाचा श्वास ठरू शकतो. तो तसाच ठरावा ही महाराष्ट्राच्या वन खात्याकडून अपेक्षा आहे.गेली अनेक वर्षे वाघांशिवाय पडझड अनुभवत असलेल्या चांदोली-कोयना पट्ट्याला या एका ऑपरेशनने नवी दिशा दिली आहे. पश्चिम घाटाच्या या दगडी कड्याकपारीत वाघ या शिखर-भक्षकाचा अभाव हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नव्हता, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा तोलच ढासळलेला होता. जंगलाची पुनरुत्पादन क्षमता कमी झाली होती. 'तारा'चे आगमन हा या तुटलेल्या साखळीला पुन्हा एकत्र जोडण्याचा टप्पा आहे. वाघ असल्यावर जंगलातील प्रत्येक प्रजातीला नैसर्गिकरीत्या आपली मर्यादा कळते. त्या त्या प्राण्यांचा वेग, हालचाल आणि जीवनशैली सुधारते आणि त्यामुळे हळूहळू जंगलाची आरोग्यवस्था जोर पकडते. सह्याद्रीचा हा फायदा थेट सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांपर्यंत पोहोचू लागेल. वाघ म्हणजे पर्यटनाचा आत्मा. दशकभरापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या नावाला वैभव होते, पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. पर्यटकांना सफारीची भावना असूनही वाघ दिसत नसल्याने चांदोली आणि कोयना पट्टा पर्यटकांच्या यादीत मागे पडत होता. तारा आल्यावर पर्यटकांचा कल पुन्हा जंगलाकडे वळेल, याचा थेट फायदा स्थानिक होमस्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन मार्गदर्शक आणि खाद्यपदार्थ उत्पादकांना होईल. सह्याद्रीत येणारा प्रत्येक पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्थेच्या चक्राला हातभार लावणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांना रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होतात. पर्यावरण शिक्षण, ईको-ट्रेल्स, बर्डिंग गाइड्स, स्थानिक स्वयंसहाय्यता गट यांना यामुळे नवे दार उघडते; परंतु 'तारा'ची गोष्ट फक्त पर्यटनाभोवती फिरत नाही.



सह्याद्रीत कोयना, वारणा, कृष्णा खोऱ्यांतील जलस्रोत हे या हिरव्यागार कड्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत. जंगल दाट असेल तर पावसाचे पाणी हळूहळू जमिनीत मुरते आणि पुढे नद्यांना नियमित प्रवाह देत राहते. पण गेल्या काही वर्षांत जंगल नष्ट होत गेल्याने पाण्याची अनियमितता वाढली. सांगली, कोल्हापूरसारख्या जिल्ह्यांमध्ये दरवर्षी पूरस्थिती तीव्र होत गेली. वाघ आल्यावर जंगलातील अतिक्रमण आणि बेकायदेशीर चराईवर प्रशासनाची नजर वाढते. वाघ असलेल्या क्षेत्रात लोक जाणीवपूर्वक सावध राहतात जंगलावर अधिक नियंत्रण ठेवले जाते. यामुळे जलस्रोतांचे दीर्घकालीन संरक्षण होते आणि नैसर्गिक नियंत्रण मिळते. हवामान बदलामुळे पावसाची स्वरूपे अधिक आक्रामक होत असताना अशा स्थिर जंगलाची गरज अधिकच वाढली आहे. या प्रकल्पाचा विस्तारित परिणाम कोकण आणि उत्तर कर्नाटकापर्यंतही जाणवेल. सह्याद्री, अंबोली, दांडेली हा नैसर्गिक प्राणी कॉरिडॉर इतिहासात जिवंत होता; पण शहरीकरण, रस्ते, खाणी, विद्युत प्रकल्प यांनी त्याच तुकडे-तुकडे केले. 'तारा'सारखे वाघ स्थलांतरित झाल्यावर या कॉरिडॉरकडे पुन्हा एकदा शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची गरज निर्माण होते. वाघांची ये-जा होत असेल तर हत्ती, गवा, अस्वल, वनकुत्रा यांच्या हालचालीही सुव्यवस्थित राहतात. जैवविविधता फक्त वाघावर अवलंबून नसली तरी वाघ हा त्या विविधतेचा मुख्य सूचक असतो. कोकणातील जंगलांवर खाणकाम किंवा अनियोजित रस्त्यांचे दडपण वाढले की अशा वाघ प्रकल्पांमुळे पर्यावरणीय अनुमतीच्या निकषांत काटेकोरपणा येतो. मात्र या प्रकल्पात धोकेही कमी नाहीत. वाघाला हवा असलेला अखंड जंगल पट्टा आज अनेक भागांत तुटलेला आहे. चांदोली, कोयना, राधानगरीला जोडणारा पट्टा अजूनही अनेक ठिकाणी अरुंद किंवा व्यत्यय आणणारा आहे. गावांची वाढ, व्यावसायिक शेती, जंगल रस्ते या सगळ्यामुळे वाघाला फिरण्यासाठी हवी असलेली शांतता कमी होते.

राजकीय विश्लेषण आणि चर्चासत्रे

मानवी-वन्यजीव संघर्षाची शक्यता वाढते. जनावरांवर हल्ले झाले तर स्थानिक लोकांचा विरोध उफाळू शकतो. म्हणूनच जलद आणि सन्मान्य पद्धतीने भरपाई देणारी यंत्रणा, सतत जनजागृती आणि गावकऱ्यांचा थेट सहभाग हे तीन स्तंभ अनिवार्य आहेत, तर दुसरीकडे, सह्याद्रीत शिकार प्राणी पुरेसे नसल्यास वाघ टिकू शकणार नाही. ताडोबात विपुल असलेले सांबर-गवा सह्याद्रीत कमी प्रमाणात दिसतात, त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने त्यांच्या वाढीकडे लक्ष द्यावे लागेल. या सगळ्यांवर शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय इच्छाशक्ती. प्रशासनातील सातत्य नसले तर अशा प्रकल्पाचे भवितव्य धोरण बदलांमध्ये अडकते. तरीही एक गोष्ट निर्विवाद आहे, वाघाचे आगमन म्हणजे निसर्गाचा आत्मविश्वास परत येणे. वाघ असताना जंगलातील वृक्षांचे पुनरुज्जीवन अधिक वेगाने होते, कारण शाकाहारी प्राण्यांचा ताण कमी होतो. दाट जंगलाने कार्बन शोषण वाढते आणि हवामान बदलाचे दडपण कमी करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. झरे आणि ओहोळ पुन्हा जिवंत होतात. पक्षी, साप, कासव, कीटक, औषधी वनस्पती यांची संख्या वाढते. हे सर्व मिळून एक मजबूत परिसंस्था तयार करते आणि ही परिसंस्था हवामान बदलाच्या संकटात माणसाला आधार देणारी सर्वात शक्तिशाली ढाल आहे. ऑपरेशन 'तारा' हे म्हणून केवळ एका वाघिणीचे स्थानांतरण नसून संपूर्ण सह्याद्रीचा पुनर्जन्म आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या पर्यावरणीय आणि आर्थिक भविष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रकल्पाला मिळणारा लोकसहभाग, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि राजकीय बांधिलकी. वाघाचे पाऊल सातारा, सांगली, कोल्हापूरच्या मातीत पुन्हा उमटले तर तो निसर्गाचा विजय असेल आणि हवामान बदलाच्या अंधाऱ्या भावी दिवसांना तोंड देण्यासाठी या प्रदेशाला वाघाच्या रूपाने मिळालेला सर्वात मोठा मित्र असेल. फक्त तो मित्र जंगलातच राहिला पाहिजे माणसांच्या घरापर्यंत त्याला येऊ न देणे ही जबाबदारी वन विभागाची!

# कार्यकर्त्यांची निवडणूक

स्थानिक स्वराज्यसंस्थेची ही निवडणूक कोणत्याही राजकीय पक्षाची जशी त्याच्या अस्तित्वाची आहे. तशी ही निवडणूक कार्यकर्त्याच्या राजकीय भविष्याचीही आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांची नगरसेवक होण्याची सुप्त इच्छा असते. सोबतचे कार्यकर्ते मित्रही कधी-कधी खरोखरच मनापासून मित्रत्वाच्या नात्याने मित्राने निवडणूक लढविण्यासाठी प्रोत्साहित करतात. त्या कार्यकर्त्याच्या निवडणूकीपूर्वी आणि नंतरही पाठीशी उभे राहतात; परंतु कधी-कधी सोबतच्या कार्यकर्त्याला 'बाद' करण्यासाठीही निवडणूक लढविण्याची हवा भरतात... महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर मधल्या पाच-सात वर्षांनंतर या स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणुका होत असल्याने साहजिकच इच्छुकांची संख्या वाढतीच असणार यात शंका नाही. कोकणातील पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये राजकारण जोरात आहे. एकीकडे पावसाने गेल्या आठवडाभरात विश्रांती घेतली आहे. पावसाच्या विश्रांतीनंतर हवामानात गारवा निर्माण झाला आहे. थंडीला सुरुवात झाली आहे. कोकणातील ही थंडी कोकणातील फळफळांच्या उत्पादनासाठी आवश्यकच आहे. आंबा, काजू बागायतीत पालवी जाऊन झाडांवर मोहोराचे धुमारे दिसू लागले आहेत. एकीकडे थंडीच वातावरण कोकणात असताना कोकणातील राजकीय वातावरण मात्र काहीसे नरम-गरम आहे. बिहारच्या निवडणूक निकालाची उत्सुकता देशभरात होती तशी ती जगभराच्या 'गजाली'मध्ये रमणाऱ्या कोकणी माणसालाही होती. नितीशकुमारांना जमतला की नाय. राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोराचा काय झाला ता बघीतलास काय, या अशा गावगजालीने या थंडीच्या वातावरणात चाय-भजी खाताना कोकणातील टपरीवर याच गजाली ऐकायला मिळतात. याचबरोबर या चहा टपरीवर स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या निवडणुकीतही काय होईल कशी चुरस होईल याचे गंमतीदार किस्सेही या गजालीच्या चर्चेत असतात.



कोकणातील चारही जिल्ह्यात सध्या निवडणुकीचे वातावरण आहे. मधल्या काही कालावधीनंतर या निवडणुका होत आहेत. म्हणजे गेल्या पाच-दहा वर्षातील नगरसेवक, पक्षांचे पदाधिकारी आणि गेल्या ५ वर्षांत प्रत्येक पक्षातील सक्रिय असलेले कार्यकर्ते यातल्या प्रत्येकालाच स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या निवडणुकीला सामोरे जात नगरपंचायत, नगरपालिकेत पदाधिकारी व्हाव अशी सुप्त इच्छा प्रत्येकाच्या मनात असतेच असते. अशी मनातली सुप्त इच्छा काही उघडपणे पक्षाकडे मागणी करून मांडतात. तर काही ठिकाणी काही इच्छूक माध्यमांचा आधार घेत ही सुप्त इच्छुक मार्ग मोकळा करतात. यामुळेच एकेका जागेवर अनेक इच्छुक अशीच काहीशी स्थिती आहे. महाराष्ट्रात सत्तेवर असलेल्या भारतीय जनतापक्ष, शिवसेना एकनाथ शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस उद्धव ठाकरे गट यांची महायुती आणि राज्यातील विरोधी असलेली राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना उबाठा गट या पक्षांची महाविकास आघाडी या महायुतीत, तर इच्छुकांची संख्या फारच लांबलचक यादी आहे. जागा एक इच्छूक अनेक अशी स्थिती आहे. महाविकास आघाडीतील राष्ट्रीय काँग्रेसपक्ष व शिवसेना उबाठा स्वतंत्ररीत्या निवडणुकीच्या रिंगणात उतरतील अशी शक्यता आहे.महायुतीतही कोकणातील जवळपास सर्वच ठिकाणी एकापेक्षा इच्छुक अनेक असल्याने 'मैत्रीपूर्ण' लढतीचा फॉर्म्युला अस्तित्वात येण्याची शक्यता आहे. राजकारणात अनेकवेळा गुंतागुंतीचे प्रश्न चर्चा आणि संवादातून सोडविले जाऊ शकतात. नगर परिषद, नगरपंचायत निवडणुकीत कोणाला उभं राहा म्हणायच आणि कोणाला थांबवायच हा खरं तर गंभीर स्वरूपाचा प्रश्न निर्माण झालेला असतो. नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या सर्व निवडणुका या 'कार्यकर्त्यां'च्या निवडणुका आहेत. यामुळे सर्वच पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याला या स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या निवडणुकीत आपणाला संधी मिळावी असं वाटत असत. या अशा संधीची सर्वसामान्य कार्यकर्ता नेहमी वाटच पाहत असतो. प्रत्येक कार्यकर्ता एखाद्या वॉर्डमध्ये, जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रभागात पाच-दहा वर्षे काम करत असतात. जेव्हा एखाद्या प्रभागात पाच-दहा वर्षे काम करत राहिल्यावर लोकांशी कायम 'टच'मध्ये राहिल्यावर त्या कार्यकर्त्याची निवडणूक लढविण्याची मानसिकता होऊन जाते; परंतु जेव्हा तो प्रभाग आरक्षणात राखीव प्रभाग म्हणून घोषित होतो. तेव्हा तो कार्यकर्ता कोलमडून जातो. याचं कारण त्या कार्यकर्त्याला पाच वर्षे थांबाव लागणार असत. पाच वर्षांच्या वेटिंग पिरियडमध्ये बरेच राजकीय संदर्भ बदललेले असतात. आजचा राजकारण हे अळवा वरच्या पाण्यासारखा आहे. आजचे कोणतेही संदर्भ उद्याच्या राजकारणाला लागू होतील असं ठरवणं आणि सांगणं सर्वांनाच अवघड आहे. राजकीय संदर्भ सध्या तर नेहमीच बदलत असतात. यामुळेच अस्थिरतेच्या सावटाखालच सध्याच राजकारणात प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता स्वत:च अस्तित्व शोधण्याचा आणि ते टिकवण्याचा प्रत्येकाचा त्याच्या-त्याच्या पातळीवर प्रयत्न होत असतात. स्थानिक स्वराज्यसंस्थेची ही निवडणूक कोणत्याही राजकीय पक्षाची जशी त्याच्या अस्तित्वाची आहे. तशी ही निवडणूक कार्यकर्त्याच्या राजकीय भविष्याचीही आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांची नगरसेवक होण्याची सुप्त इच्छा असते. सोबतचे कार्यकर्ते मित्रही कधी-कधी खरोखरच मनापासून मित्रत्वाच्या नात्याने मित्राने निवडणूक लढविण्यासाठी प्रोत्साहित करतात. त्या कार्यकर्त्याच्या निवडणुकीपूर्वी, आणि नंतरही पाठीशी उभे राहतात; परंतु कधी-कधी सोबतच्या कार्यकर्त्याला 'बाद' करण्यासाठीही निवडणूक लढविण्याची हवा भरतात. आणि याच हवेने भरलेला तो कार्यकर्ता निवडणुकीत उभा राहतो आणि ज्यांनी त्याला उभं रहाण्यासाठी प्रवृत्त करतात तेच जेव्हा सोबत नाहीत हे त्याला कळतं तेव्हा त्या कार्यकर्त्याचा 'अभिमन्यू' झालेला असतो. त्यामुळे या स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या निवडणुकीत जशी प्रत्येक पक्षाला आपण कुठे आहोत हे तपासण्याची आणि कार्यकर्त्यालाही आपला राजयोग प्रबळ आहे का, हे पाहण्याची निवडणूक ही एक संधी आहे. पाहायचय पुढे-पुढे काय होतं ते...

# आगामी काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल:देवेंद्र फडणवीस यांचे श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज उद्घाटनप्रसंगी प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता
**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर येथे श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज आणि हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नवीन वास्तूचे उद्घाटन केले. यावेळी बोलताना, आगामी काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल, असे प्रतिपादन त्यांनी केले. केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाने या उपचार पद्धतीला शिक्षण, उपचार आणि संशोधनात चालना दिल्याचे त्यांनी नमूद केले.सातार तांडा भागातील या नवीन वास्तूच्या उद्घाटनप्रसंगी इतर मागास वर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड, श्रीयश प्रतिष्ठानचे बसवराज मंगरुळे, सचिव संगिता मंगरुळे, रुग्णालय अधीक्षक डॉ. परेश देशमुख आणि अधिष्ठाता स्वाती इटगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. फडणवीस यांनी यावेळी बसवराज मंगरुळे यांच्या कार्याचे कौतुक केले.






फडणवीस यांनी आयुर्वेदाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, ही उपचार पद्धती भारतीय जीवनशैलीशी सुसंगत असून निसर्गाशी साधर्म्य साधते. वेदांमध्ये 'आयुर्वेद' या नावाने तिचा उल्लेख आहे. आयुर्वेदात केवळ आजाराच्या लक्षणांवर उपचार न करता, त्याच्या मुळाशी जाऊन शाश्वत उपचार केले जातात. जगभरात या उपचार पद्धतीचा वापर वाढत असून, अनेक परदेशी नागरिक भारतात आयुर्वेदिक उपचारांसाठी पर्यटक म्हणून येत आहेत.

कोविड-१९ महामारीच्या काळात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आयुर्वेदिक औषधांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला, असेही फडणवीस यांनी नमूद केले. केंद्र सरकारने या उपचार पद्धतीला विविध मार्गांनी प्रोत्साहन देण्याचे ठरवले आहे. प्रशिक्षित वैद्य तयार करणे हा त्यातीलच एक महत्त्वाचा भाग असून, त्यासाठी आयुर्वेद महाविद्यालयांना चालना दिली जात आहे.

आगामी दशकात भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल आणि २०४७ पर्यंत आर्थिक महासत्ता होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश आहे. मराठवाड्यातही उद्योगांना चालना दिली जात असून, छत्रपती संभाजीनगर हे इलेक्ट्रिक व्हेईकलचे केंद्र म्हणून उदयास येत आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.या उद्घाटन सोहळ्याला शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांनी फेटाळली शरद पवार यांची टीका-जो जीता वही सिकंदर

## लोकांनी आम्हाला मतदान केले, त्यांना दोष देण्याचे कारण काय?

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर (वृत्तसंस्था)**-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपवर पैसे वाटून बिहार निवडणूक जिंकल्याचा आरोप करणाऱ्या शरद पवारांची टीका जोरकसपणे फेटाळून लावली आहे. विरोधी पक्षांनी त्यांचे सरकार होते तेव्हा कोणत्याही नव्या योजना आणल्या नाही. आता आमच्या योजना लोकांना आवडत आहेत. ते आम्हाला मतदान करत आहेत. त्यामुळे लोकांना दोष देण्याची काहीच कारण नाही. जो जीता वही सिकंदर, असे ते म्हणालेत.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी सरकारने महिलांना वाटलेल्या प्रत्येकी १० हजार रुपयांमुळेच एनडीचे बिहारमध्ये विजय झाल्याचा दावा केला. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात भाजपच्या बिहार विधानसभा निवडणुकीत झालेल्या विजयावर उलटसूलट चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा हा दावा फेटाळून लावला आहे. मुख्यमंत्री नागपुरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले, जो जीता वही सिकंदर. हरल्यानंतर, पराभव झाल्यानंतर पराभव स्वीकारता आला पाहिजे. मोकळ्या मनाने आपल्या चुका



कबूल केल्या पाहिजेत. आत्मपरीक्षण केले पाहिजे. पण आत्मपरीक्षण करणे हे आमच्या विरोधी पक्षाला मान्य नाही. खऱ्या अर्थाने या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या ज्या काही योजना आहेत, या योजना करण्याची संधी सर्वांनाच होती. त्यांची सरकारे होती तेव्हा त्यांनाही होती. त्यांनी केल्या नाही. आम्ही योजना केल्या. त्या लोकांना आवडल्या. लोकांनी आम्हाला मतदान केले. त्यावर लोकांना दोष देण्याचे कारण काय आहे? विरोधक जोपर्यंत आत्मपरीक्षण करणार नाहीत, तोपर्यंत त्यांची मातीच होत राहील, असे ते म्हणाले.काँग्रेसने मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांनी यावरही भाष्य केले. ते म्हणाले, विरोधी पक्ष एकत्रित लढतो की स्वतंत्र लढत आहे यापेक्षा मुंबईच्या जनतेचा महायुतीवर विश्वास आहे. जनतेने महायुतीचाच महापौर बनवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे निश्चितपणे कोण कसे लढत आहे हा त्यांचा प्रश्न आहे. मात्र तिथे महायुती निवडून येईल यात शंका नाही. अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आहे. पत्रकारांनी याविषयी मुख्यमंत्र्यांचे लक्ष्य वेधले असता त्यांनी अजित पवारांनी राज्यातील काही मुद्यांवर अमित शहांची भेट घेतली असेल, असे ते म्हणाले.

## नवले पूल अपघातस्थळी मोहोळ यांची पाहणी

# अपघात टाळण्यासाठी ६ हजार कोटींचा उन्नत मार्ग लवकरच कार्यान्वित होणार

दैनिक वादळ वार्ता

**पुणे (वृत्तसंस्था)**-पुण्यातील मुंबई-बंगळुरु महामार्गावरील नवले पूल परिसर अपघातांसाठी कुप्रसिद्ध आहे. गुरुवारी येथे दोन कंटेनर आणि एका कारचा भीषण अपघात झाला, ज्यात आठ जणांचा मृत्यू झाला तर २० ते २५ जण जखमी झाले. या दुर्घटनेनंतर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शुक्रवारी घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

यावेळी आमदार भीमराव तापकीर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पोलिस आयुक्त अमितेश कुमार, अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम, वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव यांच्यासह मनपा आणि एनएचएआयचे अधिकारी उपस्थित होते. मोहोळ यांनी सांगितले की, या भागातील सततचे अपघात टाळण्यासाठी केंद्रीय रस्तेमंत्री नितीन गडकरी यांनी ३२ किलोमीटरचा उन्नत मार्ग मंजूर केला असून, त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येईल.मोहोळ यांच्या माहितीनुसार, नऱ्हेमधील जांभूळवाडीतील अक्षरधाम मंदिर




ते सुतारवाडी आणि तेथून रावेत दरम्यान ३२ किलोमीटरचा हा उन्नत मार्ग असेल. या प्रकल्पाचा डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) तयार होऊन त्याला मंजुरीही मिळाली आहे. हा प्रकल्प सहा हजार कोटी रुपयांचा असून, तो आता लवकर कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न केले जातील.मोहोळ यांनी सांगितले की, मागील काळात जांभूळवाडी ते वडगाव दरम्यान होणाऱ्या अपघातांबाबत तातडीने उपाययोजना करण्यात आल्या होत्या. सन २०२१-२२ दरम्यान झालेल्या एका मोठ्या अपघातानंतर कात्रज बोगदा ते नवले पूल दरम्यान स्पीडगन बसवण्यात आल्या, वाहनांचा वेग मंदावण्यासाठी रंबल स्ट्रिप्स टाकण्यात आल्या आणि पंक्चर सर्व्हिस रोड बंद करण्यात आले. यामुळे मागील दोन वर्षांत अपघातांचे प्रमाण कमी झाले होते. मात्र, गुरुवारी घडलेला अपघात दुर्दैवी असून, भरधाव ट्रकचा ताबा सुटल्याने पुढील वाहनांना धडक बसल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. याबाबत तपास सुरू आहे.यावर कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक झाले आहे. काही रंबल स्ट्रिप्सची उपाययोजना करणे, सर्व्हिस रस्ते तयार करणे आणि विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे या गोष्टी करण्यात येतील. तसेच, ओव्हरलोड ट्रकची खेड शिवापूर टोलनाक्यावर तपासणी केली जाईल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या ठिकाणच्या अपघातांबाबत यापूर्वी दिल्लीत बैठक घेतली होती.सर्व्हिस रस्ता तयार करण्याबाबत सर्व यंत्रणांची एकत्रित बैठक १५ नोव्हेंबर रोजी सर्किट हाऊस येथे घेण्यात येईल. तीव्र उतार, ओव्हरलोड गाड्या आणि वेगाने येणारी वाहने ही अपघातांची प्रमुख कारणे असल्याचे दिसून येत आहे. आगामी काळात हे अपघात होणार नाहीत याची काळजी घेतली जाईल, असे आश्वासन मोहोळ यांनी दिले.

# ग्रामीण विद्यार्थ्यांची नासाकडे झेप-पुणे जि.प. शाळांतील २५ विद्यार्थी अभ्यासदौऱ्यासाठी रवाना

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवर विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची अभूतपूर्व संधी उपलब्ध झाली आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील २५ विद्यार्थी अमेरिकेतील नासा अभ्यासदौऱ्यासाठी शनिवारी (ता. १५) रवाना होत आहेत. या विद्यार्थ्यांचा अभ्यासदौरा दहा दिवसांचा असून, त्यांच्या या प्रवासामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांची विज्ञान क्षेत्रातील झेप अधोरेखित झाली आहे.

दौऱ्यापूर्वी विद्यार्थ्यांनी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची भेट घेऊन मार्गदर्शन घेतले. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प



संचालिका शालिनी कडू, तसेच शिक्षक व पालक उपस्थित होते.


डॉ. पुलकुंडवार म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नासाला भेट देण्याची ही अत्यंत महत्त्वाची संधी आहे. या अभ्यासदौऱ्यामुळे त्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होईल आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ग्रामीण भागातूनही नावीन्यपूर्ण योगदान मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.या दौऱ्यात विद्यार्थी नासा केनेडी स्पेस सेंटर, स्मिथसोनियन नॅशनल एअर अँड स्पेस म्युझियम, नासा अर्थ इन्फॉर्मेशन सेंटर, तसेच सॅन फ्रान्सिस्कोतील प्रमुख तंत्रज्ञान कंपन्या येथे भेट देणार आहेत.

विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ शनिवारी (ता.१५) पहाटे मुंबईहून अमेरिकेसाठी रवाना होणार आहे. या गटात इयत्ता सहावी व सातवीतील नऊ मुली आणि सोळा मुले सहभागी आहेत. विद्यार्थ्यांसोबत आयुकाचे शास्त्रज्ञ समीर धुरडे, शिक्षिका माया लंघे, प्रमिला जोरी, सुनीता खलाटे तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उज्ज्वला साळुंके सहभागी होणार आहेत.हा उपक्रम 'पुणे मॉडेल स्कूल' या प्रकल्पाचा महत्त्वपूर्ण भाग असून, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आयुका (IUCAA) संस्थेचे तांत्रिक सहकार्य लाभले आहे.

# पोटेगाव बंधारा दुरुस्तीच्या कामावर अधिकारी यांची नजर; संगोबा बंधाऱ्याच्या पाण्यामुळे शंका

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

पोटेगाव बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाची पाहणी करण्यासाठी गुरुवारी पाटबंधारे विभागाचे वरिष्ठ अधिकारी ठिकाणी दाखल झाले. मे महिन्यात अवकाळी पावसामुळे थांबलेले हे काम पुन्हा सुरू करण्याच्या दृष्टीने ही हालचाल होत असल्याचे दिसते. दरम्यान, संगोबा बंधाऱ्याचे दारे टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे त्याठिकाणाहून सोडण्यात येणारे पाणी पोटेगाव बंधाऱ्यावर दबाव निर्माण करून दुरुस्तीच्या कामात अडथळा निर्माण करेल का, अशी शंका स्थानिक पातळीवर व्यक्त होत आहे.मे महिन्याच्या १३ तारखेला झालेल्या जोरदार पावसामुळे बंधाऱ्याचे काम थांबवावे लागले होते. सध्या गॅबिनचे काम पूर्ण झाले असून फेब्रुवारी महिन्यात फाउंडेशन पात्रातील काम हाती घ्यावे, अशा सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्या असल्याचे समजते.या पाहणीदरम्यान जे.ई. अतुल दाभाडे, कांबळे, इंजि. कांबळे, साई कृपा कन्स्ट्रक्शनचे पंढरपूरचे भरत थिटे, कार्यरत स्टाफ, पोथरे-निलज ग्रामपंचायत सदस्य अनिल गायकवाड, अविनाश



गायकवाड आदी उपस्थित होते.

बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम नियोजित वेळापत्रकानुसार पूर्ण होणार की पुन्हा विलंब होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अंधत्व मुक्त महाराष्ट्र संकल्पनेतून १० कोटींचे CSR प्रकल्प मंजूर

## नेत्र शस्त्रक्रिया शिबिरे, आरोग्य उपकरणे खरेदी सारख्या आरोग्यविषयक उपक्रमांना चालना

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) निधीच्या माध्यमातून आरोग्यविषयक उपक्रमांना मोठा हातभार लागला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि अंधत्व मुक्त महाराष्ट्र या संकल्पनेतून तब्बल ९९३.९७ लाख (सुमारे १० कोटी रुपये) किमतीचे प्रकल्प मंजूर झाले आहेत. हे प्रकल्प प्रामुख्याने आरोग्यसेवा, जनजागृती आणि गरजू रुग्णांसाठी वैद्यकीय सहाय्य वाढविण्यावर केंद्रित आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अंधत्व मुक्त महाराष्ट्र या उद्देशाने आणि ध्येयाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत या सामाजिक दायित्व निधीतून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

**मंजूर प्रकल्प पुढीलप्रमाणे आहेत.**

इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्या सहकार्याने नागपूर जिल्ह्यात डोळ्यांचे शिबिरे व ५,००० मोतीबिंदू शस्त्रक्रिया यासाठी २५०.५४ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात येत आहे. या माध्यमातून ग्रामीण व दुर्बल घटकांतील नागरिकांना मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच नागपूर आणि अमरावती विभागातील १० शासकीय रुग्णालयांमध्ये नेत्र तपासणी शिबिर व १० हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. यासाठी ३६४.८५ लाख इतके अनुदान देण्यात आले आहे. विदर्भातील ग्रामीण भागात नेत्र आरोग्य सेवा बळकट करणे आणि मोठ्या प्रमाणात मोफत शस्त्रक्रिया उपलब्ध करून देणे. हा याचा उद्देश आहे.

अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून रुग्णसेवा अधिक प्रभावी बनवणे या उद्देशाने इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्या माध्यमातून भूलतज्ज्ञ, नेत्रविज्ञान व रेडिओलॉजी विभागासाठी वैद्यकीय उपकरणांची खरेदीसाठी ३२८.५८ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. या प्रकल्पांसाठी एकूण ९९३.९७ लाख निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकाराने पुढील प्रस्ताव राबवण्यात येणार आहेत. कोळसा क्षेत्रातील कंपन्यांमार्फत मुख्यमंत्री सहायता निधी (CMRF) तसेच राज्यातील विविध रुग्णालयांशी उडठ सहकार्य स्थापून गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविणे.या सर्व प्रकल्पांमुळे विदर्भातील आरोग्यसेवा सुधारते आहे. मोफत नेत्रशिबिरे व शस्त्रक्रियांमुळे हजारो रुग्णांना दृष्टिदान मिळते आहे. वैद्यकीय उपकरणांमुळे नागपूरमधील सार्वजनिक रुग्णालयांची सेवा गुणवत्ता वाढेते आहे.या उपक्रमांद्वारे महाराष्ट्रात उडठ निधीचा वापर प्रभावीपणे आरोग्य क्षेत्रातील मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी होत आहे, हे स्पष्ट होत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक उत्तरदायित्व आणि लोककल्याण यांचे संगम साधणारे हे प्रकल्प राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणार आहेत.

# न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल विद्यार्थींच्या सर्वांगीण विकासाला पाठबळ देणारे उत्कृष्ट व्यासपीठ-पोकळे

## न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलमध्ये फन-फेअर कार्यक्रम उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
नेकनूर । प्रतिनिधी

प्रत्येक व्यक्तीच्या शैक्षणिक जीवनातील शालेय शिक्षणाचा टप्पा महत्त्वाचा असतो. या टप्प्यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक ज्ञानाची पायाभरणी उत्तम प्रकारे झाली. तर यशाची इमारत भक्कमपणे उभी राहत असते. विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम शाळांमध्ये राबवले जातात. यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, बौद्धिक, शारीरिक विकास होत असतो. न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल या शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला वाव देण्यासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. ही शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पाठबळ देणारे उत्कृष्ट व्यासपीठ- आहे. असे प्रतिपादन कै. अण्णासाहेब पाटील सेवा संस्थेचे अध्यक्ष रमेश भाऊ पोकळे यांनी केले आहे.

येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल नेकनूर येथे फनफेअर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश भाऊ पोकळे हे बोलत होते. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून जेष्ठ उद्योजक सय्यद कौसरभाई साहेब हे उपस्थित होते. तर व्यासपीठावर नेकनूरचे पोलीस उपनिरीक्षक दिनकर तोंडे सर, संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे,उद्योजक बबन तात्या जोगदंड, सय्यद जबी कादरी, शेख गुड्डो काजी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना रमेश भाऊ पोकळे म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगातमध्ये विद्यार्थी चौकस बुद्धीमत्ता आणि त्यांच्या चिकाटी असणे आवश्यक आहे. शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांची बौद्धिक, ज्ञानाची पायाभरणी



यशस्वीरित्या होणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच अशा शालेय उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल ही केवळ शिक्षण देणारी शाळा नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उत्कृष्ट वातावरण निर्माण करणारे सर्जनशील व्यासपीठ ही आहे. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नाने फनफेअर मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. अशा कार्यक्रमाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना शालेय जीवनामध्येच नैसर्गिक, सांस्कृतिक आणि मनोवैज्ञानिक मूल्यांची ओळख होते. यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. अशाप्रकारचे कार्यक्रम आमची शाळा नेहमीच आयोजित करते, याचा आम्हाला अभिमान आहे.यावेळी उपमुख्याध्यापक श्री. भारत चंद्रसेन पटाईत यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कला व प्रदर्शनांना पालक आणि ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला पालक, ग्रामस्थ आणि मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले.

# जिल्ह्यात लंपी आजाराने जनावराचा मृत्यू शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात विविध तालुक्यांमध्ये साधारणता ८०० ते ९०० जनावरांना लंपी त्वचारोग बाधा झालेली आहे यात ५० ते ६० जनावरांचा मृत्यू देखील झाला असून जे शेतकरी पशुपालक आहेत ते चिंतेत आहेत या गंभीर परिस्थितीमध्ये यावर प्रतिबंधात्मक उपाय योजना तातडीने करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे सद्यस्थितीत बीड जिल्ह्यात लंपी त्वचा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला आहे जिल्ह्यात शेकडो जनावरांना बाधा झाली आहे.आतापर्यंत ८०० ते ९०० जनावरे बाधित झाले असून पन्नास-साठ जनावरांचा



मृत्यू झालेला आहे.दरम्यान ५०० ते ६०० जनावरे उपचारा नंतर बरी झालेली आहेत दरम्यान ३,४१,१३५ जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले असून या आजारामुळे शेतकरी वर्गावर मोठा आर्थिक परिणाम झाला असून दूध उत्पादनात घट झाली आहे.अनेक ठिकाणी दुधाचे सेवन टाळण्याच्या सूचना देण्यात आल्याने दुग्ध व्यवसायिकानाही फटका बसत आहे या पार्श्वभूमीवर लंपी आजाराने बाधित भागात पशुवैद्यकीय पथके वाढवून उपचार तातडीने सुरू ठेवावेत लसीकरण मोहिमेला गती देऊन शंभर टक्के जनावराचे लसीकरण पूर्ण करावे. लंपी बाधित व मृत जनावरांच्या मालकांना म्हणजे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर करावी.जिल्ह्यातील पशुधन बाजार दुग्ध संघ व डेअरी केंद्रासाठी तात्पुरती मार्गदर्शक तत्वे लागू करावीत तसेच जिल्हा प्रशासनास आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आपल्या हस्तक्षेपामुळे या परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यात निश्चित मदत होईल असा विश्वास ही प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी व्यक्त केला आहे.बीड जिल्ह्यात मागील काही दिवसा पासून लंपी या आजाराचा प्रादुर्भाव वाढत आहे. यामुळे जनावराचे मृत्यू देखील झालेले आहेत शिवाय पशुपालकाचा मोठा खर्चही होत आहे अशावेळी बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी या विषयाकडे लक्ष देणे आवश्यक आहे परंतु तसे होताना दिसत नाही.अशा वेळी केवळ प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी या विषयात लक्ष घालून बीड जिल्ह्यात आपले चौफेर लक्ष असल्याचे दाखवून दिले आहे.

# श्री राम कोकीळ यांच्या कडुन श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री. संस्कार इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांना सोमवारी सकाळी श्री. राम कोकीळ यांच्याकडुन शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.याविषयी सविस्तर वृत्त असे की, चिंचोली माळी येथील रहिवासी व सध्या पुणे येथे यशस्वी उद्योजक म्हणून परिचित असलेले श्री.राम कोकीळ यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत व शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रेरणा मिळावी या उदात्त हेतूने व आपल्या भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे या उद्देशाने केज तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देणाऱ्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील सर्व शिक्षीकांना व विद्यार्थ्यांना शालेय



साहित्याचे वाटप केले.यावेळी बोलताना श्री.राम कोकीळ यांनी श्री संस्कार इंग्लिश स्कूल बद्दल गौरवोद्गार काढले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी पांडुरंग गलांडे सर,श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप चे अध्यक्ष अनिल गलांडे, प्रिन्सीपल,संचालक अमोल गलांडे यांच्यासह सर्व शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचेप्रास्ताविक अनिल गलांडे यांनी केले तर सूत्र संचालन आरती आचार्य यांनी केले व आभार प्रदर्शन प्रिन्सीपल सिमा फुटाणे यांनी केले.

# सौ.शितलताई लांडगे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाच्या महिला तालुका अध्यक्षपदी निवड

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

येडेश्वरी फाउंडेशनच्या प्रमुख सौ.शितलताई लांडगे यांच्या कार्याची दखल घेऊन व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीशी एकनिष्ठ राहून त्यांची काम करण्याची जिद्द पाहुन दिनांक १७ नोव्हेंबर रोजी पवनसुत निवासस्थान येथील कार्यालय येथे बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते येडेश्वरी फाउंडेशनच्या प्रमुख सौ. शितलताई लांडगे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटा च्या महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी नियुक्ती. करण्यात आली यावेळी तालुकाध्यक्ष शंकरजाधव, माजी पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर तात्या चौरे,पंचायत समिती सदस्य पिंटू बप्पा ठोंबरे, सरपंच मुकुंद मामा कणसे,सरपंच विलास आप्पा



जोगदंड,सरपंच सुरज पटाईत तसेच तालुक्यातील अनेक प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थितीत होती.सौ. शितलताई लांडगे यांना तालुक्याची जबाबदारी देऊन शुभेच्छांचा वर्षाव कार्यकर्त्यातून होत आहे इतकेच नव्हे तर इतर तालुक्यातून देखील व महिलांमधून सुद्धा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# लातूर महापालिकेची सत्ता राखण्याचे काँग्रेस समोर आव्हान तर भाजपला पुन्हा फुलवायचेयं कमळ

दैनिक वादळ वार्ता
लातूर । नदीम पटेल

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १८ जागा असून त्या पैकी ९ जागा या महिलांसाठी राखीव आहेत. तर सर्वसाधारणसाठी ३९ जागा असून, त्यापैकी २० जागा या महिलांसाठी राखीव राहणार आहेत. आगामी महापालिका निवडणूक प्रक्रियेसाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्यात आला आहे. लातूर महापालिकेच्या आरक्षणाचा १८ प्रभागातील ७० जागांसाठी मंगळवारी आरक्षण काढण्यात आले. या आरक्षणानंतर भारतीय जनता पक्ष तसेच काँग्रेसच्या काही दिग्गजांना फटका बसला आहे. त्यांना एक तर सर्वसाधारणमधून उभे रहावे लागेल अन्यथा प्रभाग बदलावा




लागेल. काही माजी नगरसेवक मात्र सेफ झोनमध्ये राहिले आहेत. जिल्ह्यातील काँग्रेसचे नेते आणि लातूर शहराचे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्यापुढे आता सत्ता राखण्याचे आव्हान असणार आहे. तर माजी मंत्रीआमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्यासह भाजपच्या इतर नेते त्यांना कसे रोखतात ? याकडे सगळ्यांचे लक्ष असणार आहे. लातूर महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत प्रभागरचनेत बदल झालेला नव्हता. गेल्यावेळी आहेत. सारखेच १८ प्रभाग व ७० नगरसेवक असणारयातील पहिले सोळा प्रभागात प्रत्येकी चार तर शेवटच्या १७व १८ प्रभागात प्रत्येकी तीन नगरसेवक असणार आहेत. यापैकी ३५ नगरसेवक या महिला असणार आहेत. अनुसूचित जातीसाठी बारा जागा असून, त्यापैकी सहा जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. अनुसूचित जमातीसाठी एक जागा आहे.८२ हजार ९४० लोकसंख्या गृहीत धरण्यात आली आहे. यात अनुसूचित जातीची संख्या ६७हजार ४७४ इतकी आहे. त्यामुळे अनुसूचित जातीसाठी १२ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तर अनुसूचित जमातीची संख्या ५ हजार ५५० इतकी असून त्यांच्यासाठी एक जागा राखीव झाली आहे.

# एकलव्य स्कुल धडगावच्या(सलसाडी) खो-खो संघाची राष्ट्रीय पातळीवर दमदार चमक!

दैनिक वादळ वार्ता
रविंद्र । वळवी मोलगी

एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, धडगाव (सलसाडी) येथील १९ वर्षा आतील मुलींच्या खो-खो संघाने राष्ट्रीय स्तरावर अप्रतिम कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. विभागीय आणि राज्य पातळीवरील सलग विजयानंतर या संघाने भक्कम खेळाच्या जोरावर थेट राष्ट्रीय स्पर्धेत प्रवेश मिळवला.



या स्पर्धेत देशभरातील १६ राज्यांचे बलाढ्य संघ सहभागी झाले होते. महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याचा मान एकलव्य मॉडेल रेसिडेन्सील स्कुल धडगावच्या मुलींना मिळाला, ही जिल्ह्याच्या दृष्टीने मोठी गौरवाची बाब ठरली. या सामन्यांत मुलींनी विलक्षण वेग, कौशल्य आणि जिद्द दाखवत सर्वांचे लक्ष वेधले. अंतिम सामना आंध्र प्रदेश संघाविरुद्ध झाला. दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. तीव्र संघर्षात महाराष्ट्राच्या मुलींना पराभव स्वीकारावा लागला आणि स्पर्धेचे उपविजेतेपद त्यांच्या नावे झाले. उपविजेते पद मिळाले असले तरी ही कामगिरी राष्ट्रीय पातळीवर चमकणारे मोठे यश मानले जात आहे. या यशामागे क्रिडा शिक्षक निलेंदर शर्मा यांचे नियोजन, मार्गदर्शन आणि कठोर सरावाची मोलाची भूमिका आहे. त्याचबरोबर प्राचार्य पोपटराव चौरे, अधिक्षक रणजीत मोरे, सुनिल गावित, रजनी पाथोर यांचे ही सततचे सहकार्य, प्रोत्साहन आणि पाठबळ संघाला लाभले.

आदिवासी व ग्रामीण भागातील मुलींनी राष्ट्रीय स्तरावर इतकी मोठी मजल मारल्याने शाळा, शिक्षकवर्ग, पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. या कामगिरीनंतर भविष्यात मुली आणखी मोठ्या पातळीवर चमकतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## सालोड(हि.) वासियांनी साकारला लोकसहभागातून वनराई बंधारा

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत विविध उपक्रमांना गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता
सालोड (हि.) । प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत सालोड हिरापूर व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या साप्ताहिक श्रमदान उपक्रमाला मोठा लोकसहभाग लाभत आहे. या उपक्रमांतर्गत नागठाणा रोडवरील अविनाश कुबडे यांच्या शेताजवळील नाल्यावर गावकऱ्यांनी श्रमदानातून वनराई बंधारा उभारून जलसंवर्धनाचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.ग्रामपंचायत सालोड हिरापूर तर्फे अभियानांतर्गत प्लास्टिकमुक्त गाव उपक्रम, घरकुलधारकांच्या घरांवर रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्पांची बसावट, दर शनिवारी साप्ताहिक श्रमदान, गृहकचरा विलगीकरण जनजागृती, आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड शिबिरे, दिव्यांग ओळखपत्र वितरण, साप्ताहिक



आरोग्य शिबिर, तसेच वृक्षारोपण उपक्रम अशा अनेक लोकाभिमुख योजना राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे ग्रामविकासाला नवी गती मिळत असून ग्रामस्थांमध्ये सकारात्मक वातावरणाची निर्मिती झाली आहे.

वनराई बंधाऱ्यामुळे उन्हाळ्यात भूजल पातळी स्थिर ठेवण्यास मदत होणार असून जनावरांना पाण्याची उपलब्धता वाढेल. तसेच शेतीसाठी आवश्यक पाणी साठवणूक होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.या श्रमदानात सरपंच अमोल कन्नाके, उपसरपंच आशिष कुचेवार, ग्रामपंचायत अधिकारी देवर्षी बोबडे, कृषी सहाय्यक शुभांगी ढोले, सदस्य मनिराम देवघरे, अतुल जुडे, सुरेश ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते सलीम पठाण, संजीव वाघ, कुणाल टिपले यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, बचतगट प्रतिनिधी, परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.ग्रामपंचायत अधिकारी देवर्षी बोबडे यांनी गावकऱ्यांना आवाहन केले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील पुढील उपक्रमातही सर्वांनी सहभाग घेऊन आपले गाव स्वच्छ, समृद्ध, हरित आणि सशक्त बनवावे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077